बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी
पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन
करण्यासंदर्भात.

---

**महाराष्ट्र शासन**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-११११/प्र.क्र.००७(ब)/पापु-०७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : १६ जुलै, २०१२

वाचा : (१) शासन निर्णय,पापुवस्वावि, क्र.ग्रापायो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/ पापु०७, दि.१७ मार्च,२०१०
(२) शासन शुध्दिपत्रक क्र.ग्रापायो-११०९/ प्र.क्र.१०४ (अ)/ पापु-०७ ,दि.३१ जानेवारी, २०११

**प्रस्तावना:**

भारतीय राज्य घटनेच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर, राज्यघटनेच्या ११ व्या अनुसूचीनुसार पिण्याच्या पाणी पुरवठा हा विषय संपूर्णपणे पंचायत राज संस्थांच्या अधिकार क्षेत्रात आल्यानंतर, राज्य शासनाने अधिकाधिक अधिकार व जबाबदारी पंचायत राज संस्थांकडे देण्याच्या क्या पुरोगामी धोरणाचा अवलंब केलेला आहे, त्या धोरणाचा एक भाग म्हणून, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राज्यामध्ये मागणी आधारित समूह सहभागाच्या लोकाभिमुख धोरणानुसार राबविण्यात येतो. त्याअनुषंगाने पिण्याच्या पाणी पुरवठ्याचे जास्तीत जास्त अधिकार ग्रामस्तरावर देण्यात आलेले आहेत. त्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची मागणी, आखणी, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपविण्यात आलेली आहे.

राज्यात एकूण मंजूर १०१२ ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांपैकी ७५६ योजना पूर्ण झाल्या असून त्यापैकी, ५५९ योजना कार्यान्वित आहेत. तर, १९७ योजना विविध कारणांमुळे बंद आहेत. योजनेची प्रभावी देखभाल व दुरुस्ती न होणे, स्त्रोत अपुरे ठरणे, त्यातील समाविष्ट गावांना पर्यायी स्त्रोतातून पाणी पुरवठा होत असल्याने योजना बंद होणे, योजना हस्तांतरीत न झाल्याने देखभाल न होणे, तसेच मोठ्या दुरुस्तीची आवश्यकता असल्याने या प्रादेशिक योजना बंद अवस्थेत आहेत. बंद असलेल्या या प्रादेशिक योजनांची देखभाल दुरुस्ती करणे संबंधित गावांच्या संयुक्त समितीला, जिल्हा परिषदांना किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास निधी अभावी शक्य होत नाही, अशी परिस्थिती आहे.

त्यामुळे, विविध कारणांमुळे बंद असलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्याची आवश्यकता विचारात घेता, बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी योजनांच्या पुनरुज्जीवनासाठी योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन, राज्यातील बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांसाठी पुनरुज्जीवन योजना सुरु करण्यास शासन मान्यता देत आहे. सदर पुनरुज्जीवन योजना ही दोन टप्प्यात राबविण्यात येईल. टप्पा-१ अंतर्गत अस्तित्वातील ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा व्यवस्थेमध्ये प्राथमिक सुधारणा करणे आणि त्या आधारे टप्पा-२ मध्ये योजनेचे पुनरुज्जीवन करून पाणी पुरवठा व्यवस्था स्थापित करणे आवश्यक
[illegible]

D:\2012\GR-2012\Pr.Kr.007(B) II Rejuvenation GR. 15-7-12.doc

राहील. पुनरुज्जीवन योजनेच्या अंतर्गत टप्पा-१ अंतर्गत करावयाच्या प्राथमिक सुधारणांचा खर्च हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या (NRDWP) शाश्वती (Sustainability) अंतर्गत करण्यात यावा.

२. बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना पुनरुज्जीवीत करण्यासाठी टप्पा-१ अंतर्गत प्राथमिक सुधारणा आणि त्या आधारे टप्पा-२ मध्ये योजनेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी खालील कार्य पध्दती राहील.

**अ. टप्पा १ अंतर्गत प्राथमिक सुधारणा:-** अस्तित्वातील बंद ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा व्यवस्थेचा अभ्यास, योजना बंद असण्याची कारणे, योजनेची उपयोगात येवू शकणारी उपांगे, गावाची लोकसंख्या, पाण्याची मागणी / भविष्यातील मागणी, इत्यादींचा अभ्यास करून बंद पडलेल्या योजनेचे पुनरुज्जीवन करण्याचा आराखडा तयार करण्यासाठी अस्तित्वातील पाणी पुरवठा व्यवस्थेमध्ये प्राथमिक सुधारणांची कामे टप्पा-१ मध्ये घेण्यात यावी, त्यामध्ये घटक सर्वेक्षण, पाणी लेखापरीक्षण, ऊर्जा लेखापरीक्षण, जीआयएस मॅपिंग, हायड्रॉलिक मॉडेलिंग, बल्क मिटर्स बसविणे, संगणकीय बिलिंग व वसुली पध्दती इत्यादी बाबींचा समावेश राहील. त्या अनुषंगाने सोबतच्या जोडपत्र- अ नुसार पाणी पुरवठा सुधारणांची कामे टप्पा-१ अंतर्गत घेण्यात यावीत. वरील प्राथमिक सुधारणांची कामे करण्यासाठी १००% अनुदान अनुज्ञेय राहील.

**ब. वित्तीय सुधारणांची कामे:-** स्थानिक स्वराज्य संस्थेने पाणी पुरवठा व स्वच्छतेसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करावे तसेच स्वतंत्र लेखे ठेवावेत. प्राथमिक सुधारणांतर्गत अवैध नळ जोडण्या नियमित करून संगणकीकृत बिलींग व वसुली व्यवस्था स्थापित करावी.

बंद ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांमध्ये टप्पा-१ अंतर्गत संयुक्त समिती/ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक सुधारणांच्या (Reforms) प्रस्तावांना कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांनी तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील योजनांच्या प्रस्तावांना कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी तांत्रिक मंजूरी देवून प्रचलित कार्यपध्दतीनुसार प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर संबंधित संस्थेस अनुज्ञेय अनुदानाच्या ५०% अनुदानाचा हप्ता वितरीत करावा. पहिल्या हप्त्यापैकी ८०% रक्कम खर्च झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर उर्वरीत ५०% अनुदानाचा दुसरा हप्ता वितरीत करावा.

टप्पा-१ अंतर्गत प्राथमिक सुधारणा अहवालाच्या आधारे बंद ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे टप्पा-२ अंतर्गत पुनरुज्जीवन करण्यासाठी खालील कामांना अनुदान अनुज्ञेय राहील :

(१) स्रोत कमी पडत असल्याने त्याचे बळकटीकरण करणे किंवा नवीन स्रोत घेणे,

(२) योजनेची मुख्य जलवाहिनी निकामी झाल्याने किंवा मोडकळीस आल्याने, त्याची दुरुस्ती किंवा ती बदलणे,

(३) योजनेची पंपिंग मशिनरी नादुरुस्त असल्यास तिची दुरुस्ती वा अपवादात्मक परिस्थितीत ती बदलणे,

(४) योजनेचे जलशुद्धीकरण केंद्र नादुरुस्त असल्यास, ते दुरुस्त करणे किंवा त्यातील उपांगे बदलणे,

(५) योजनेची वितरण व्यवस्था कुचकामी झालेली असल्याने ती दुरुस्त करणे किंवा आवश्यक तेवढा भाग बदलणे.

(७) योजनेमधील अनेक गावे बाहेर पडल्याने, उर्वरित गावांवर येणारा योजनेच्या कार्यान्वयनाचा ताण कमी करण्यासाठी योजनेमध्ये भौतिक बदल करणे.

४. वरीलपैकी कारणे विचारात घेऊन, निरनिराळ्या कामांच्या उपाययोजना सदर प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी अंमलात आणाव्या लागतील. याचा अभ्यास टप्पा १ अंतर्गत प्राथमिक सुधारणा मध्ये संबंधित यंत्रणांनी ( संयुक्त समिती / जिल्हा परिषद/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) करावा. त्यानुसार टप्पा - २ अंतर्गत पुनरुज्जीवन प्रस्ताव तयार करताना खालील मुद्यांच्या आधारे मूल्यमापन करण्यात यावे.

(१) योजना कार्यान्वित होऊन किती कालावधी झालेला आहे. तसेच दुरुस्तीसाठी वेळोवेळी किती खर्च करण्यात आला आहे.

(२) योजनेतील ज्या उपांगाची दुरुस्ती / बदल करावयाचा आहे, अशी उपांगे वगळता उर्वरित व्यवस्था पुढील किमान १० वर्षांसाठी तरी उपयोगी ठरणार आहे.

(३) योजना पुन्हा कार्यान्वित करण्याची संबंधित ग्रामपंचायतींची मानसिकता आहे.

(४) योजनेतून बाहेर पडलेली गावे विचारात घेता, योजना उर्वरित गावांसाठी परवडणारी ठरणार आहे.

(५) योजना कार्यान्वित केल्यावर त्यातून संबंधित गावे वर्षभर पाणी घेणार आहेत.

(६) जर योजना हस्तांतरीत झालेली नसेल तर, ती पुनरुज्जीवनानंतर, संबंधित संयुक्त समिती / जिल्हा परिषद हस्तांतरीत करुन घेण्यास तयार आहे, तसेच पाण्याचा दर आकारणी, वसुली, प्रभावी देखभाल व दुरुस्ती कशा पध्दतीने करण्यात येणार आहे.

५. वरीलप्रमाणे मूल्यमापन झाल्यानंतर, ज्या बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे टप्पा-२ अंतर्गत पुनरुज्जीवन करुन त्या कार्यान्वित करणे व्यवहार्य आहे, अशा योजनांना पुनरुज्जीवित करण्याचे सविस्तर प्रकल्प प्रस्ताव तयार करुन त्यांना दि.१७ मार्च, २०१० च्या शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील तरतुदींनुसार तांत्रिक मान्यता देण्यात यावी. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१००३१७१५३८२९००१ असा आहे. बंद पडलेल्या ज्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन करावयाचे आहे त्यांचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या (NRDWP) वार्षिक आराखड्यामध्ये समावेश करावा. बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या टप्पा-२ अंतर्गत पुनरुज्जीवनाचा खर्च हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातून (NRDWP) (Coverage) व्याप्ती अंतर्गत करण्यात यावा.

६. बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे टप्पा २ अंतर्गत पुनरुज्जीवन करण्यासाठी ग्राम पंचायतींची संयुक्त समिती / जिल्हा परिषदेचे प्रस्ताव हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत, तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चालविण्यात येत असलेल्या योजनांचे प्रस्ताव, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत शासनास सादर करण्यात यावेत. सदर प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :

| | |
|---|---|
| (१) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अध्यक्ष |
| (२) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई | सदस्य |

| | |
|---|---|
| (३) सह सचिव / उप सचिव (पापु-०७) | सदस्य |
| (४) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य |
| (५) संचालक, पाणी, स्वच्छता व सहाय्य संस्था | सदस्य |
| (६) मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पापुवस्ववि | सदस्य |
| (७) अवर सचिव (पापु-०७) | सदस्य सचिव |

७. या समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :

(१) जिल्हा परिषद / महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय व्यवहार्यता तपासून मान्यता देणे.

(२) बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन सार्वजनिक खाजगी सहभागातून (PPP) करण्यासाठी, अशा योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी सल्लागारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. अशा प्रस्तावांची तांत्रिक, आर्थिक, व्यवस्थापकीय दृष्ट्या तपासणी करून सदर योजनेसाठी पर्याप्तता अनुदानाच्या प्रमाणाबाबत (Viability Funding) निर्णय घेणे.

(३) बंद पडलेल्या योजनांचे पुनरुज्जीवन विविध विकल्पांच्या आधारे करण्यासाठी शक्यता पडताळणी व त्यानुसार निर्णय घेणे.

(४) बंद पडलेल्या योजना तसेच पुनरुज्जीवनासाठी मंजूर केलेल्या प्रकल्पांचा वेळोवेळी आढावा घेऊन, पुढील कार्यपद्धतीबाबत शिफारस करणे.

समितीने प्रस्तावाला मंजूरी दिल्यानंतर, रु.३.०० कोटीपर्यंतच्या प्रस्तावांना जिल्हा परिषदेकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. तर रु.३.०० कोटींपेक्षा जास्त किंमतीच्या प्रस्तावांना शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

९. बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन केल्यानंतर ती हंगामी स्वरूपात न चालविता नियमित चालविण्यात यावी.

१०. प्रस्तावांना तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी, योजनेमध्ये सहभागी असलेल्या गावांची संयुक्त समिती गठीत करण्यात यावी. प्रत्येक ग्रामसभेकडून सदर योजनेत सहभागी होणे, लोकवर्गणी भरणे, त्याचप्रमाणे योजना कार्यान्वित झाल्यावर ती संयुक्त समितीच्या माध्यमातून चालविण्यास तयार असल्याबाबतचे ठराव करून घेण्यात यावेत. शिवाय समितीचे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते उघडणे सुरू करण्यात यावे.

११. योजनेसाठी शासन अनुदान वितरीत करण्याची व लोकसहभागाची रक्कम भरण्याची कार्यपद्धती शासन शुद्धीपत्रक क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०७ (अ)/पापु-०७ दि.३१ जानेवारी, २०११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०११०१३११६१०५१००१ असा आहे.

१२. संयुक्त समिती / जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या पुनरुज्जीवित योजनांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी, संचालक, पाणी, स्वच्छता व सहाय्य संस्था यांची राहील. तर, महाराष्ट्र

जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची राहील. त्यानुसार, शासनास मासिक अहवाल सादर करण्यात यावा.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०७१६१५५६३४३१८०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शैला ए.)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
३) मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
४) मा.विधीमंडळ सदस्य (सर्व)
५) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव, ग्राम विकास व पंचायत राज, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
८) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) संचालक, पाणी स्वच्छता व सहाय्य संस्था (WSSO), नवी मुंबई
११) सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१२) सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
१४) सर्व अधिक्षक अभियंता (ग्रामीण व नागरी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१५) अधिक्षक अभियंता, राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष, नवी मुंबई
१६) सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
१७) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१८) महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१९) महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरिक्षा व लेखा), मुंबई.
२०) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
२१) उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२२) सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
२३) सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकर
२४) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२५) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६) मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
२७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
२८) निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु.०७

प ११२३(४००-१-२०१३)

## प्राथमिक सुधारणा टप्पा-१ मध्ये पूर्ण करावयाची कामे

### जोडपत्र - अ

(शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१११३/प्र.क्र.००७(ब)/पापु-०७ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ; जुलै, २०१[illegible])

| अ.क्र | प्राथमिक सुधारणा | संनियंत्रण आणि मूल्यांकनासाठी कामगिरी निर्देशांक |
|---|---|---|
| १ | ग्राहक सर्वेक्षण. | • १०० टक्के प्रत्यक्ष सर्वेक्षण करणे.<br>१.अनधिकृत नळ जोडण्यांची संख्या निश्चित करून त्यांचे अधिकृत नळजोडणीत रुपांतर करणे.<br>२.सर्व सार्वजनिक नळ जोडण्यांचे हातपंप मध्ये/वैयक्तिक नळ जोडणीत रुपांतर करणे<br>३.प्रत्येक घराबाबत संगणकीय डेटा तयार करणे व तो अद्यावत ठेवणे. |
| २. | ग्राहक तक्रार निवारण पध्दत स्थापित करणे | • ग्राहक तक्रार निवारण पध्दत स्थापित करणे |
| ३. | सर्व औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांना मीटर बसविणे | • १०० टक्के औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांना मीटर बसविणे(Bulk Metering)<br>• पाणी पुरवठा व्यवस्थेवर बल्क मिटर बसविणे. |
| ४ | जी.आय.एस.मॅपींग | • पाणी पुरवठा योजनेच्या वितरण व्यवस्थेबाबत (net work) माहिती जी.आय.एस वर संकलित करणे. |
| ५ | पाणी व ऊर्जा लेखापरिक्षण | • पाणी लेखापरिक्षण पूर्ण करणे.<br>• पाणी गळतीचे प्रमाण (NRW) निश्चित करणे.<br>• योजनेच्या पुनर्वसनासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे.<br>• योजनेचे ऊर्जा लेखापरीक्षण करणे व पुनर्वसनासाठी कामे निश्चित करणे. |
| ६ | वित्तीय व्यवस्थापन | • संगणकीय देयके वाटपाची पध्दत स्थापित करणे.<br>• १०० टक्के देयके वाटप करणे व किमान ८० टक्के वसुली करणे.<br>• देखभाल दुरुस्ती खर्चाची ८०-९० टक्के वसुली साध्य करणे.<br>• पाणीपट्टी दर सुधारीत करणे. |
| ७ | सांडपाणी दूषित पाण्याच्या स्त्रोतांचे नियंत्रण | • दूषित असणाऱ्या सर्व स्त्रोतांची संख्या निश्चित करणे.<br>• सांडपाणी/ घनकचरा व्यवस्थापनासाठी गाव स्वच्छता आराखडा तयार करणे (Village Sanitation Plan) |

जास्त होत असलेल्या किंवा १०० मीटरपेक्षा जास्त उंचीवर
पाणी न्यावे लागणा-या ग्रामीण पाणी पुरवठा यो जनांना
लोकवर्गणी माफ करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग १२८
शासन निर्णय क्रमांक ग्रापायो-१२०८/प्र.क्र.[illegible]/पापु-०७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक १६ जुलै, २०१२

वाचा:१.शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापायो १२०८/प्र.क्र.९६/पापु -०७,दि.१८/८/२००८

२. शासन परिपत्रक, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापायो -१११०/प्र.क्र.१४१/पापु-०७, दि.१/७/ २०१०

३. शासन शुध्दिपत्रक, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापायो-१११०/प्र.क्र.१४१/पापु-०७, दि.१२/११/ २०१०

**प्रस्तावना:** संदर्भ क्र.१ येथिल शासन निर्णयान्वये पाणी गुणवत्ता बाधित गावे /वाड्या तसेच अन्य गावे / वाड्या जेथे नव्याने पाणी पुरवठा योजनेची आखणी करताना, जवळपास पिण्याच्या पाण्याचे सुरक्षित व खात्रीचे उद्भव उपलब्ध न झाल्याने त्यांना ३ किलोमीटर व त्यापेक्षा जास्त अंतरावरील उद्भव निवडावे लागतात किंवा विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीमुळे ज्या योजनांसाठी १०० मीटर पेक्षा जास्त उंचीवर पाणी उचलावे लागणार असेल, अशा योजनांच्या बाबतीत संबंधित गावे / वाड्यांवरील लोकवर्गणीचा भार कमी करण्यासाठी त्यांना योजनेची उद्भवापासून साठवण टाकीपर्यंतची पाईपलाईन, ब्रेक प्रेशर टँक, पंपीग मशिनरी इ.वरील खर्चावरील लोकवर्गणी माफ करण्यासाठी प्रधान सचिव (पा.पु.व स्व.वि) यांच्या अध्यक्षतेखाली शासन स्तरावर समिती गठित करण्यात आली आहे.

२. दि.१८/८/२००८ च्या शासन निर्णयान्वये ३ कि.मी. पेक्षा लांबीच्या उपांगासाठीच्या लोकवर्गणी मागणीबाबत पुरेशी स्पष्टता होत नसल्यामुळे संदर्भ क्र.२ येथिल दि.१/७/२०१० च्या शासन निर्णयान्वये याबाबत स्वयंस्पष्ट सूचना निर्गमित करण्यात आल्या. संदर्भ क्र.३ येथिल दि.१२/११/२०१० च्या शुद्धिपत्रकान्वये हा निर्णय दि. १८/८/२००८ नंतर प्रशासकीय मान्यता मिळालेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना लागु असल्याबाबत स्पष्टिकरण देण्यात आले.

महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेच्या अंमलबजावणी कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुद्धिपत्रक क्रमांक ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१३३/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : १४ ऑगस्ट, २०१२**

वाचा : १) पा. पु.व स्व. वि., शा.नि. क्र. ग्रापाधो-११११/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक : १८ नोव्हेंबर, २०११
२) पा. पु.व स्व. वि., शा.शुद्धीपत्रक. क्र. ग्रापाधो-११११/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक : ३० जानेवारी, २०१२
३) पा. पु.व स्व. वि., शा.शुद्धीपत्रक. क्र. ग्रापाधो-११११/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक : ०८ फेब्रुवारी, २०१२.

**प्रस्तावना :**

राज्यातील ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबांना खाजगी नळजोडण्या व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी **महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना** संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राज्यात सुरु करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र. २ व ३ येथील शासन शुद्धीपत्रकान्वये या योजनेच्या अंमलबजावणीच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटी विचारात घेऊन त्यात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुद्धिपत्रक :**

संदर्भ क्र.१ येथील दि.१८ नोव्हेंबर,२०११ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ६ पुढीलप्रमाणे वाचावा :

६. जागे अभावी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधकाम करणे शक्य नसेल अशा ठिकाणी, सामुदायिक शौचालय बांधकामाची कामे करता येतील. अशा ठिकाणी सामुदायिक शौचालय बांधण्यासाठी आवश्यक ती जागा ग्रामपंचायतीने किंवा संबंधितांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. **अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबियांसाठी वैयक्तिक शौचालये किंवा सामुदायिक शौचालये** ही केवळ दोन शोषखड्डयावर आधारित बांधावीत. अशा वस्त्यांमधील गावे / वाड्यांमधील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबामध्ये बांधण्यात आलेल्या सामुदायिक शौचालयावर पाऊसपाणी संकलन संच बसवून पाणी उपलब्ध करुन देणे तसेच विजेसाठी सौर उर्जेचे आवश्यक संच बसविणे इत्यादी कामे देखील घेता येतील.

२. संदर्भ क्र.३ येथील दि.०८ फेब्रुवारी,२०१२ चे शासन शुद्धीपत्रक अधिक्रमित करण्यात येत असून, त्यातील परिच्छेद क्र.८ खालीलप्रमाणे वाचावा :

८. ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत घ्यावयाच्या गावांच्या निवडीसाठीचा प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे राहील:

१) जिल्ह्यातील निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेली गावे त्यापैकी अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांची संख्या जास्त आहे.

२) निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेल्या गावांव्यतिरिक्त अन्य गावे, त्यापैकी अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांची संख्या जास्त आहे.

३) जिल्ह्यातील निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेली गावे किंवा त्याव्यतिरिक्त अन्य गावांमध्ये संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत वा अन्य कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांसाठी बांधलेली शौचालये जी मोडकळीस आल्याने वापरण्यास अयोग्य आहेत, अशा शौचालयांची कामे या योजनेतून अनुज्ञेय राहतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी, या प्राधान्य क्रमानुसार जिल्ह्यासाठी शासनाकडून एकूण उपलब्ध होणारा / झालेला निधी (किंवा मागील आर्थिक वर्षात उपलब्ध झालेला निधी) व त्यामध्ये बसू शकणारी

गावे यांचा मेळ घालुन त्यानुसार जिल्ह्यातील गावांची निवड करावी. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी, या योजनेअंतर्गत खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालयांची अंदाजपत्रके व आराखडे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), यांच्या समन्वयाने नियमित अथवा कंत्राटी अभियंत्याकडून तयार करून घ्यावेत. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालयांच्या प्रस्तावांना तांत्रिक मान्यता दयावी. जिल्हा परिषदेने त्यांच्या विहित कार्यपद्धतीनुसार या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देऊन या योजनेची अंमलबजावणी करावी. या योजनेअंतर्गत खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालयांची अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्यासाठी २ टक्के प्रकल्प व्यवस्थापन शुल्क अनुज्ञेय राहील, ज्याचा खर्च प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

३. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०८१४१३३१३५१८०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ल.गो.ढोके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
३. सर्व विधी मंडळ सदस्य
४. प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक
५. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
७. विभागीय आयुक्त (सर्व)
८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०. संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे,
११. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (WSSO) बेलापूर, नवी मुंबई
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१३. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१४. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१५. उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
१६. सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१७. सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१८. सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ
१९. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
२०. सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
२२. सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
२३. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी
२४. सर्व विशेष समाज कल्याण अधिकारी
२५. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये,
२६. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
२७. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२८. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३०. मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
३१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव अधिकारी व कार्यासने
३२. निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी प्रचलित दरडोई खर्चाचे निकष ३० ते ५० टक्केपर्यंत शिथिल करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-११०८/प्र.क्र.०५२/पापु-०७

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १३ ऑगस्ट, २००९

वाचा:- १) शा.नि.पापुवस्ववि. क्र. ग्रापापु १०९५/ सीआर ११२४ /पापु-०७, दि.१८ मे, १९९६.

प्रस्तावना :

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राज्यात ग्रामीण भागात नळ पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. या योजनांसाठी दरडोई खर्चाचे निकष शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निश्चित केलेले आहेत. हे निकष त्यावेळच्या दरसूचीवर आधारित होते. त्याचप्रमाणे, योजनेचा उद्भव लांब असणे, योजनेसाठी दोन टप्प्यावर पाणी उचलावे लागणे, इत्यादी कारणांमुळे, या शासन निर्णयातील तरतूदीनुसार योजना तयार करणे शक्य होत नाही. त्यामुळे दरडोई खर्चाच्या निकषामध्ये वाढ करण्याच्या सूचना क्षेत्रीय स्तरावरून प्राप्त होत आहेत.

उपरोक्त परिस्थितीमुळे, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रशासकीय मंजूरी प्रक्रियेमध्ये येणाऱ्या अडचणी विचारात घेता, दरडोई खर्चाचे निकष काही प्रमाणात शिथिल अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रशासकीय मंजूरी प्रक्रियेमध्ये निर्माण होणारी उपरोक्त अडचण विचारात घेऊन, दि.१८ मे, १९९६ च्या शासन निर्णयामध्ये निश्चित केलेल्या दरडोई खर्चाचे निकष हे नवीन प्रस्तावांसाठी खालील प्रमाणे शिथिल करण्याचे अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| क्षेत्र | दरडोई खर्चाची प्रचलित मर्यादा | बिगर पाणी गुणवत्ता बाधित गावांमध्ये ३०% प्रमाणे | पाणी गुणवत्ता बाधित गावांमध्ये ५०% प्रमाणे |
|---|---|---|---|
| कोकण प्रदेश वगळून राज्याच्या इतर भागासाठी | | | |
| १) निर्धारित डोंगरी भाग | रु. २९३० | रु. ३८०९ | रु. ४३९५ |
| २) ३० मी. पेक्षा जास्त Static lift असलेल्या नळ योजना | रु. १७९० | रु. २३२७ | रु. २६८५ |
| ३) ३० मी. पर्यंत Static lift असलेल्या नळ योजना | रु. २१९० | रु. २८४७ | रु. ३२८५ |
| कोकण क्षेत्रासाठी | | | |
| १) निर्धारित डोंगरी भाग | रु. २३३० | रु. ३०२९ | रु. ३४९५ |
| २) ३० मी. पेक्षा जास्त Static lift असलेल्या नळ योजना | रु. १९७० | रु. २५६१ | रु. २९५५ |
| ३) ३० मी. पर्यंत Static lift असलेल्या नळ योजना | रु. १५३० | रु. १९८९ | रु. २२९५. |

द. दरडोई खर्चाचे निकष [illegible] शासन निर्णय [illegible]

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारावयाच्या लोकवर्गणीबाबत...

# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो ११११२/ प्र. क्र.९६ /पापु-०७,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. ३ ऑक्टोबर, २०१२

**वाचा** :-१. शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.ग्रापापु १०९९/प्र.क्र.३२८/पापु ०७ .दि२७/७/२०००

२.शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.ग्रापाधो ११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु ०७ .दि१७/३/२०१०

३. शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.ग्रापायो १२०८/प्र.क्र.९६/पापु ०७,दि.१८/८/२००८

**प्रस्तावना:** संदर्भ क्र.२ येथिल दि.१७ मार्च,२०१० च्या शासन निर्णयान्वये राज्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची अमंलबजावणी सुरु झालेली आहे. राज्य शासनाच्या संदर्भ क्र. १ येथिल दि.२७ जुलै, २००० च्या धोरणात्मक शासन निर्णयास अनुसरुन लाभार्थ्यांकडून १०% लोकवर्गणी घेण्याबाबत स्पष्ट निर्देश दि.१७ मार्च, २०१० च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत. प्रस्तुत लोकवर्गणीची रक्कम ग्रामपंचायतीने स्वत:च्या उत्पन्नातून अथवा लाभार्थ्यांकडून वसूल करुन भरण्याची मुभा देण्यात आली आहे. लोकवर्गणीची रक्कम ग्रामपंचायतीने स्वत:च्या उत्पन्नातून भरली तरी योजना कार्यान्वित झाल्यावर संबंधित लोकवर्गणी पाणीपट्टीसोबत वसूल करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारण्यात येणारी लोकवर्गणी प्रचलीत धोरणानुसार योजनेच्या एकूण भांडवली खर्चावर १० टक्के प्रमाणे आकारली जाते.त्यापैकी ५ टक्के लोकवर्गणी रोख स्वरुपात व ५ टक्के लोकवर्गणी वस्तू अथवा श्रमदानाच्या स्वरुपात भरण्याची सवलत देण्यात आली आहे. अनुसूचित जाती व जनजाती बहूल क्षेत्रासाठी ५ टक्के लोकवर्गणी आकारण्यात येते. त्यापैकी १ टक्के लोकवर्गणी रोख स्वरुपात व ४ टक्के लोकवर्गणी वस्तू अथवा श्रमदानाच्या स्वरुपात भरण्याची सवलत देण्यात आली आहे. याशिवाय ग्रामस्थांवरील लोकवर्गणीचा भार सुसह्य करण्यासाठी संदर्भ क्र. दि.१८ ऑगस्ट, २००८ च्या शासन निर्णयान्वये ज्या योजनांच्या उद्भवाचे अंतर मुख्य साठवण,टाकीपासून ३ कि.मी. पेक्षा जास्त होत असेल अथवा १०० मी. पेक्षा जास्त उंचीवर पाणी न्यावे लागणार असेल अशा योजनांमधील ३ कि.मी. पेक्षा पुढील अंतरावरील पाईपलाईन, ब्रेक प्रेशर टँक, पंपींग मशिनरी इ. कामांसाठी येणाऱ्या खर्चावर लोकवर्गणी माफ करण्यात येते.

अनेक योजनांच्या बाबतीत उद्भव विहीर, जॅकवेल, पंपगृह,जलशुद्धीकरण केंद्र त्याचप्रमाणे जमिनीवरील व उंचावरील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या यांच्या बांधकामासाठी ग्रामस्थांकडून जमिनी घेण्यात येतात. त्याशिवाय, ग्रामस्थांना योजनेच्या या उपांगांवर लोकवर्गणी भरावी लागते. त्यामुळे ग्रामस्थांकडून योजनेच्या ज्या उपांगासाठी जमिनी उपलब्ध होतील, त्या उपांगासाठीच्या खर्चावर लोकवर्गणीत सवलत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारावयाच्या लोकवर्गणीसंदर्भात खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत :

१. ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची उद्भव विहीर, जॅकवेल, पंपगृह, जलशुद्धीकरण केंद्र त्याचप्रमाणे जमिनीवरील व उंचावरील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या यांच्या बांधकामासाठी ग्रामस्थांकडून जर जमिनी विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आलेल्या असतील आणि तसे जमिनीचे बक्षिसपत्र करुन दिले असेल तर, त्या जमिनीवर वरिल ज्या उपांगाचे बांधकाम करण्यात येईल त्या उपांगासाठीच्या खर्चावर लोकवर्गणी आकारण्यात येणार नाही.

उदा. योजनेच्या उद्भव विहीरीसाठी ग्रामस्थांकडून विनामूल्य जमिन उपलब्ध करून देण्यात आली असेल अथवा जमिनीचे बक्षिसपत्र करुन दिले असेल व या उद्भव विहीरीच्या बांधकामाची अंदापत्रकीय किंमत रु. २० लक्ष असेल तर उद्भव विहिरीच्या रु.२०.०० लक्ष खर्चावर अनुज्ञेय लोकवर्गणी माफ करण्यात यावी. अशा प्रकारे योजनेच्या उपरोक्त उपांगांसाठी जर ग्रामस्थांकडून विनामूल्य जमिन उपलब्ध करून देण्यात आली असेल आणि तसे जमिनीचे बक्षिसपत्र करुन दिले असेल तर या उपांगांच्या अंदाजपत्रकीय किंमतीवर लोकवर्गणी लागू होणार नाही.

२. मात्र ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची उद्भव विहीर, जॅकवेल, पंपगृह, जलशुद्धीकरण केंद्र त्याचप्रमाणे जमिनीवरील व उंचावरील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या यांच्या बांधकामासाठी ग्रामपंचायतीने जमिन उपलब्ध करून दिलेली असेल अथवा अशी जमिन शासकीय असेल तर वरिलप्रमाणे लोकवर्गणीत सवलत अनुज्ञेय राहणार नाही.

३. लोकवर्गणीत वरिलप्रमाणे देण्यात येणारी सवलत सन २०१२-१३ व त्यानंतरच्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मंजूर वार्षिक कृती आराखड्यात समाविष्ट असलेल्या गावांच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लागू राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२१००३११३९५२१८०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ल.गो.ढोके)

अवर सचिव ,महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्य मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य
महासंचालक,माहिती आणि जनसंपर्क संचालनालय,मुंबई
सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
संचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,
संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर ,नवी मुंबई
मुख्य अभियंता,ग्रामीण व नागरी म.जी.प्रा.
,मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषदा
सर्व अधिक्षक अभियंता,विभागीय भारत निर्माण कक्ष
सर्व कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता,ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद
महालेखापाल,महाराष्ट्र - १ मुंबई(लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल,महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधि लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड,नस्ती पापु-०७.

**निर्मल भारत अभियानाच्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्याबाह्य ग्रामपंचायती/गावातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट शिथिल करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

शासन परिपत्रक क्रमांक: ग्रापायो १११२/ प्र. क्र.१६०/पापु-०७,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. ४ ऑक्टोबर, २०१२

**वाचा :** १. शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.ग्रापायो ११०९/प्र.क्र.१०४(अ)/ पापु ०७ .दि.२७/३/२०१०

२. शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र ग्रापायो १११२/ प्र. क्र.१५४/पापु-०७, दि.१४/९/२०१२

**प्रस्तावना:** संदर्भ क्र.१ येथिल शासन निर्णयान्वये नवीन पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करताना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असणे व योजनेकरीता अनुदानाचा दुसरा हप्ता मिळण्यापुर्वी गाव १०० टक्के हागणदारी मुक्त असणे आवश्यक आहे, अशा सुचना देण्यात आल्या आहेत. ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी वेगाने करता यावी यासाठी, गावांमधील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी निधींच्या तिनही हप्त्यांच्या अदायगीसाठी गाव / वाडी हागणदारी मुक्त असण्याची अट काही कालावधीसाठी शिथिल करण्यात आली होती. संदर्भ क्र.२ येथिल शासन निर्णयान्वये राज्यातील बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांमध्ये यावर्षी अपु-या पावसामुळे निर्माण झालेली दुष्काळ सदृष्य स्थिती विचारात घेऊन संदर्भाधीन दि.१७/०३/२०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा प्रस्ताव तयार करतांना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असण्याची अट तसेच प्रगतीपथावरील योजनांना शासन हिश्श्याचा दुसरा हप्ता वितरीत करण्यासाठी विहित करण्यात आलेली १०० टक्के हागणदारी मुक्तीची अट या दोन जिल्ह्यांसाठी दि.३१ मार्च,२०१३ पर्यंत शिथिल करण्यात आली आहे.

सन २०१२-१३ पासून केंद्र शासन पुरस्कृत संपूर्ण स्वच्छता अभियानाचे निर्मल भारत अभियान असे नामकरण करण्यात आले आहे.निर्मल भारत अभियानाची अंमलबजावणी ही आता ग्रामपंचायतींना आधारभूत मानून करण्यात येणार आहे.त्यासाठी निर्मल भारत अभियानांतर्गत सर्व जिल्ह्यांमार्फत वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्यामधील ग्रामपंचायतींच्या क्षेत्रातील प्रत्येक घरामध्ये वैयक्तीक/सामुदायीक शौचालयाची सुविधा उपलब्ध होऊन ते ग्रामपंचायत क्षेत्र १०० टक्के हागणदारी मुक्त होणे आवश्यक आहे. त्यामुळे सन २०१२-१३ मध्ये निर्मल भारत अभियानाच्या अंमलबजावणीसाठी तयार करण्यात आलेल्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या ग्रामपंचायती/गावांना हागणदारीमुक्तीची अट अबाधित ठेवण्याची तर इतर ग्रामपंचायती/गावांमध्ये प्रगतीपथावर असलेल्या व प्रस्तावित असलेल्या नविन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट काही कालावधीपर्यंत शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:** केंद्र पुरस्कृत निर्मल भारत अभियानाच्या अंमलबजावणीसाठी सन २०१२-१३ च्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या ग्रामपंचायती/गावांना संदर्भाधिन दि.१७/०३/२०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली हागणदारी मुक्तीची अट लागू राहील तर इतर ग्रामपंचायत/गावांमध्ये प्रगतीपथावर असलेल्या व प्रस्तावित असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी संदर्भाधिन दि.१७/०३/२०१०,च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा

प्रस्ताव तयार करतांना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असण्याची अट तसेच प्रगतीपथावरील योजनांना शासन हिश्श्याचा दुसरा हप्ता वितरीत करण्यासाठी विहित करण्यात आलेली १०० टक्के हागणदारी मुक्तीची अट दि.३१ मार्च,२०१३ पर्यंत शिथिल करण्यात येत आहे.

त्यानंतर प्रचलित धोरणानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट व अनुदान वितरणाची पध्दत कायम राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२१००४१२१५४८९८०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(र.अं.खडसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्य मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य
सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,
संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर ,नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
सर्व अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद
महालेखापाल,महाराष्ट्र - १ मुंबई(लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल,महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता
सर्व प्रादेशिक उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड नस्ती,पापु-०७

**टंचाईग्रस्त गावांतील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक ग्रापाधो-१११२/प्र.क्र.५०/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : ७ डिसेंबर, २०१२**

वाचा : १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.बैठक २००८/ प्र.क्र.१५४६/ऊर्जा-५, दिनांक २४ जुलै, २००८

२) शासन परिपत्रक, पा.पु.व स्व.वि.क्रमांक ग्रापाधो-१११२/प्र.क्र.५०/पापु-०७. दि. २७ मार्च, २०१२

**प्रस्तावना** : राज्यात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेता, राज्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांमधील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा मार्च, २०१२ ते जून, २०१२ पर्यंत म्हणजेच टंचाई कालावधीत खंडीत न करणे व यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने मागणी केल्यानुसार अशा पाणी टंचाईग्रस्त गावांमधील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे वीज देयके अदा करण्यासाठी जिल्हा स्तरावर आवश्यक तो निधी उपलब्ध असावा यासाठी संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. सदर उपाययोजनांना दि.३० जून,२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक** : राज्यात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेता, राज्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांमधील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, वीज देयकांची अदायगी न झाल्याने बंद राहू नयेत यासाठी, संदर्भ क्र.२ येथिल दि.२७ मार्च, २०१२ च्या शासन परिपत्रकान्वये करावयाच्या उपाययोजना/देण्यात आलेल्या सूचना दि.३० जून,२०१३ पर्यंत अंमलात राहतील. **त्यानुसार ,राज्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांमधील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा दिनांक ३० जून २०१३ पर्यंत खंडीत होणार नाही, याची दक्षता सर्व जिल्हाधिका-यांनी घ्यावी.**

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२१२०७१४२७०७३६२८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
**(ल.गो.ढोके)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्य मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी

सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य

प्रधान सचिव,(उर्जा).उद्योग ,उर्जा व कामगार विभाग

सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवा प्राधिकरण,मुंबई

संचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,

संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर ,नवी मुंबई

अति.संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर ,नवी मुंबई

मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषदा

सर्व अधिक्षक अभियंता,विभागीय भारत निर्माण कक्ष

सर्व कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवा प्राधिकरण,

सर्व कार्यकारी अभियंता,ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद

महालेखापाल,महाराष्ट्र - १ मुंबई(लेखा परिक्षा/ लेखा व आज्ञेयता)

महालेखापाल,महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व आज्ञेयता)

मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई

उप मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे औरंगाबाद, अमरावती व नागपूर

सर्व प्रादेशिक उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,

सर्व मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

मुख्य अभियंता,भारत निर्माण कक्ष,नवी मुंबई

सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा

सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई

पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासो

निवड नस्ती,पापु-०७

टंचाईग्रस्त गावांतील स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा जून,२०१३ पर्यंत खंडीत न होण्याबद्दल उपाययोजना करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-२०१३/प्र.क्र.०१/पापु-०७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : ७ जानेवारी, २०१३

वाचा : १. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.बैठक २००८/ प्र.क्र.१५४६/ ऊर्जा- ५, दिनांक २४ जुलै, २००८

२. शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.वेप्रोअ १३०९/प्र.क्र.६९/पापु-०७,दि.१७/८/२००९

३. शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापाधो-१११२/ प्र.क्र.५०/ पापु-०७, दि. २७ मार्च, २०१२

४. शासन परिपत्रक, क्रमांक ग्रापाधो-१११२/प्र.क्र.५०/पापु-०७,दि.७ डिसेंबर, २०१२

**प्रस्तावना :**

राज्यात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेता, राज्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांमधील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा मार्च, २०१२ ते जून, २०१२ पर्यंत म्हणजेच टंचाई कालावधीत खंडीत न करणे व यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने मागणी केल्यानुसार अशा पाणी टंचाईग्रस्त गावांमधील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची वीज देयके अदा करण्यासाठी जिल्हा स्तरावर आवश्यक तो निधी उपलब्ध असावा यासाठी संदर्भ क्र.३ येथील शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. संदर्भ क्र.४ येथील शासन परिपत्रकान्वये सदर उपाययोजनांना दि.३० जून,२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

संदर्भाधीन दि.१७/८/२००९ च्या शासन निर्णयान्वये ग्राम पंचायत / जिल्हा परिषदांच्या स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या मागील वर्षातील वीज देयकांच्या प्रतिपूर्तीसाठी प्रोत्साहन अनुदान देण्याचे धोरण विहित करण्यात आले आहे.

सध्याची भीषण टंचाई परिस्थिती लक्षात घेता राज्यातील ५० वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावांमध्ये स्वतंत्र ग्रामीण नळ योजनेच्या वीज देयकांची अदायगी करण्यासाठी ग्रामपंचायतींना सहाय्य करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेता, वीज देयकांची अदायगी न झाल्याने त्या बंद होऊ नयेत म्हणून राज्यातील ५० वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावांच्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांच्या दि.०१ एप्रिल,२०१२ पासूनच्या चालू वीज देयकांच्या ६७ % रकमेची अदायगी महावितरण कंपनीस करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्याची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात येईल :

१) संदर्भाधीन दि. २७/३/२०१२ व दि. ७/१२/२०१२ च्या शासन परिपत्रकानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समित्यांनाच टंचाईग्रस्त भागाच्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनेकरिता ६७ % रक्कम अदा करण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद हे सदस्य तर, कार्यकारी अभियंता, महावितरण हे सदस्य सचिव आहेत.

२) ५० वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावांमधील ग्रामपंचायतींनी पाणी पुरवठा योजनांच्या वीजेच्या चालू बिलांच्या ३३ % रक्कम अदा केल्यास परिच्छेद-१ मधील समितीने त्या बिलाच्या उर्वरित ६७ % रक्कम महावितरण कंपनीस अदा करावयाची आहे. याकरिता समितीच्या बैठकीत कार्यकारी अभियंता, महावितरण यांनी संबंधित ग्रामपंचायतींची सविस्तर माहिती सादर करावी. या समितीच्या बैठका किमान दर १५ दिवसांनी घेण्यात याव्यात. या बैठकीत ज्या ग्रामपंचायतींनी ३३ % रक्कम भरली नसेल, त्यांची माहिती समितीच्या निदर्शनास आणून त्यांना ही रक्कम भरण्याकरिता समितीच्या वतीने कार्यकारी अभियंता, महावितरण यांनी १५ दिवसांची मुदत द्यावयाची आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी गट विकास अधिकारी व स्थानिक अधिकाऱ्यांच्या मार्फतसुध्दा तातडीने ३३ % रक्कम अदा करण्याची सूचना ग्रामपंचायतींना द्यावी. समितीच्या पुढच्या सभेपर्यंत जर त्या ग्रामपंचायतींनी ३३ % रक्कम भरली तर त्यांच्या बिलाच्या उर्वरित ६७ % रक्कम समितीने महावितरणकडे जमा करावी.

३) संदर्भाधीन शासन परिपत्रक दि. २७/३/२०१२ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे सदर देयके अदा करण्यासाठी बँक खाते उघडण्यात आलेले आहे.

४) महावितरण कंपनीस अदा करावयाच्या ६७ % रकमेपैकी ५० % रक्कम जिल्हा परिषदेकडील जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीमधून तर उर्वरित १७ % रक्कम जिल्हाधिकारी यांच्याकडे शासनाकडून २२४५ लेखाशीर्षाखाली प्राप्त झालेल्या रकमेतून द्यावयाची आहे.

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्याकडील जिल्हा देखभाल दुरुस्ती निधी, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राप्त होणारा देखभाल दुरुस्तीसाठीचा निधी, राज्यस्तरावरुन देखभाल व दुरुस्तीसाठी प्राप्त झालेले अनुदान व जिल्हा परिषदेच्या इतर निधीमधून वीज देयकांसाठी लागणारी ५० % एवढी रक्कम जिल्हाधिकारी समितीच्या बचत खात्यामध्ये तात्काळ जमा करावी. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांनी महावितरण कंपनीस अदा करावयाची १७ % रक्कम २२४५ लेखाशीर्षामधून त्यांच्या बचत खात्यात जमा करावयाची आहे.

६) या शासन निर्णयान्वये महावितरणला द्यावयाची रक्कम अदा करण्याकरिता जर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे असलेला देखभाल व दुरुस्ती निधी कमी पडत असेल तर त्यांनी सदर अधिकची रक्कम उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावा. याप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर

जिल्हाधिकारी यांनी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत उपलब्ध इतर तरतुदींमधून पुर्नविनियोजनाद्वारे जिल्हा परिषदेला देखभाल व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा व हा निधी प्राप्त झाल्याबरोबर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या खात्यात जमा करावा. पुर्नविनियोजनाद्वारे जिल्हा नियोजन समितीला अधिकचा निधी उपलब्ध करणे शक्य नसल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे मागणी करावी. याच प्रकारे जिल्हाधिकाऱ्यांना २२४५ लेखाशीर्षामधून १७ % रक्कम देण्याकरिता अनुदान कमी पडल्यास मदत व पुनर्वसन विभागाकडे अनुदानाची मागणी करावी. जिल्हाधिकारी यांच्या समितीकडे देण्यात आलेल्या निधीचे व महावितरणकडे अदा करण्यात आलेल्या रकमेचा हिशोब नियमितपणे ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयाची राहील.

२. सदर शासन निर्णय महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभाग तसेच ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०९०७१६४५१४०९२८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(एस. एस. संधू)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
विधानमंडळ सदस्य (सर्व)
मुख्य सचिव यांचे उप सचिव
अपर मुख्य सचिव, (महसूल वन विभाग)
प्रधान सचिव(उर्जा), उद्योग ,उर्जा व कामगार विभाग
प्रधान सचिव,ग्राम विकास व पंचायत राज
प्रधान सचिव (वित्त),वित्त विभाग
प्रधान सचिव ,नियोजन विभाग
सचिव, महसूल वन विभाग (मदत व पुनर्वसन)
